
शनिवार, ११ डिसेंबर २०२१
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक १४४
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## ‘कोरोनासंबंधी नियमांकडे नागरिकांचे दुर्लक्ष होतेय’



**नवी दिल्ली :** जगभरात कोरोनाच्या ओमायक्रॉन विषाणूमुळे भीतीचे वातावरण आहे. अवघ्या २० दिवसांत तो ५७ देशांमध्ये पसरला आहे. असे असताना दुसरीकडे भारतात व्यापक लसीकरण झाल्यामुळे लोकांमध्ये कोरोनाबाबतच्या नियमांकडे काहीसे दुर्लक्ष करण्याची वृत्ती दिसत आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्रालयाचे सहसचिव लव अग्रवाल तसेच नीती आयोग आणि कोरोनाबाबतच्या टास्क फोर्सचे सदस्य डॉ. व्ही. के. पॉल यांनी चिंता व्यक्त करीत नागरिकांना इशारा दिला आहे. भारतात मास्क घालण्याचे प्रमाण हळूहळू कमी होऊ लागले आहे, मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे की, लस आणि मास्क या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. आपण जागतिक परिस्थितीपासून शिकायला हवे. सध्या अतिशय जोखमीच्या आणि अस्वीकारार्ह अशा पद्धतीने वर्तणूक होऊ लागली आहे, असे ते म्हणाले.

अंतरंग
उरण पंचायत समितीवर दिव्यांगांचा मोर्चा/३
रायगड जिल्ह्यात आज राष्ट्रीय लोक अदालत/४
जे. डी. इलेव्हन संघाने प्रीमियर लीग जिंकली/६

## निवडक

### वानखेडे प्रकरणात नवाब मलिकांनी मागितली माफी

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे अल्पसंख्याकमंत्री नवाब मलिक यांनी वानखेडे प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात माफी मागितली आहे. केंद्रीय अमली पदार्थ नियंत्रण दलाचे (एनसीबी) विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्या कुटुंबीयांबाबत यापुढे कोणतेही विधान करणार नाही, अशी हमी त्यांनी शुक्रवारी (दि. १०) पुन्हा कोर्टात दिली.

### आता धनंजय मुंडे सोमय्यांच्या रडारवर

**मुंबई :** भाजपचे नेते किरीट सोमय्या यांच्या रडारवर आता नवीन मंत्री आहेत. राज्याचे समाजकल्याणमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर त्यांच्याशी संबंधित एका साखर कारखान्याप्रकरणी सोमय्या यांनी भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. मुंडे यांनी मृत व्यक्तीचे अंगठे घेऊन कारखान्यासाठी जमीन बळकावल्याचा आरोप सोमय्यांनी केला आहे.

# बिपीन रावत अमर रहे!

## लष्करी इतमामात अंत्यसंस्कार; पती-पत्नीला एकाच वेळी अखेरचा निरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

‘अमर रहे अमर रहे बिपीन रावत अमर रहे’, ‘वंदे मातरम’, ‘भारत माता की जय’, ‘जब तक सूरज चांद रहेगा, बिपीनजी का नाम रहेगा’ अशा घोषणा देत शुक्रवारी (दि. १०) देशाच्या तिन्ही संरक्षण दलांचे प्रमुख (सीडीएस) जनरल बिपीन रावत यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्यासह पत्नी मधुलिका रावत यांच्या पार्थिवावर दिल्लीच्या ब्रार स्क्वायर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.





सीडीएस बिपीन रावत यांच्या अंत्ययात्रेत देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख सहभागी झाले होते. त्यांनी रावत यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. अंत्यसंस्कारासाठी हजारो लोकही जमले होते. दिल्ली आणि आजपासच्या राज्यातून लोक तिरंगा घेऊन आले होते. याशिवाय श्रीलंका, भूतान, नेपाळ आणि बांगलादेशातील सैन्याचे कमांडरही वीर योद्ध्याला अखेरची सलामी देण्यासाठी आवर्जून हजर होते.

रावत यांची अंत्ययात्रा स्मशानभूमीत आल्यावर त्यांना १७ तोफांची सलामी देऊन गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. त्यानंतर मंत्रोच्चारात लष्करी इतमामामध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या कन्या कृतिका आणि तारिणी यांनी मात्या-पित्यांना मुखाग्नी दिला. या वेळी अनेकांना अश्रू अनावर झाल्याचे दिसून आले.

## मनपा निवडणुकांवेळी शिवसेना वॉर्ड रचनेत सोयीस्कर बदल करते

### जितेंद्र आव्हाड यांचा गंभीर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**



महापालिकेच्या निवडणुका आल्या की सत्ताधारी शिवसेना वॉर्ड रचनेत मनमानी करते. आपल्याला निवडणूक जिंकता यावी यासाठी महापालिका अधिकारी, निवडणूक आयोगाचे अधिकारी यांना हाताशी धरून आपल्याला सोईस्कर होईल अशी वॉर्ड रचना करून घेते. हा अनुभव आम्हाला ठाण्यात आला होता, असा गंभीर आरोप राज्याचे गृहनिर्माणमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला. ते नवी मुंबईत आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात बोलत होते. त्यामुळे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी व शिवसेना या दोन पक्षांमध्ये जुंपण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई महापालिका निवडणूक लक्षात घेता ऐरोली येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात जितेंद्र आव्हाड यांनी शिवसेना आणि अप्रत्यक्षपणे एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. निवडणुका आल्यावर सत्ताधारी शिवसेना मनपा अधिकारी, निवडणूक आयोगाचे अधिकारी यांना हाताशी धरून आपल्याला सोईस्कर होईल अशी वॉर्ड रचना करून घेते, असा आरोप करून अशी कृत्ये लोकशाहीला घातक असून याकडे निवडणूक आयोगाने लक्ष दिले पाहिजे, अशी मागणीही आव्हाड यांनी केली.

शिवसेना मोठा भाऊ म्हणून जिल्ह्यात आदर करू, मात्र बोलायचे एक आणि करायचे एक हे खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा या वेळी आव्हाड यांनी दिला. आम्ही आघाडी धर्म पाळायचा, मात्र तुम्ही पडद्यामागून संबंध ठेवायचे. मग आम्ही शत्रुत्व का घ्यायचे? राजकारणातील गणिते कधीही बदलू शकतात. मौका सभी को मिलता है. त्यामुळे आम्ही कुणाबरोबर जायचे याचे पर्याय खुले आहेत, असेही आव्हाड या वेळी म्हणाले.

# गव्हाण आणि न्हावे ग्रामपंचायत हद्दीतील पाणीप्रश्नी बैठक



### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची सिडको भवनमध्ये अभियंत्यांशी चर्चा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण आणि न्हावे ग्रामपंचायत हद्दीतील पाणी प्रश्नासंदर्भात गुरुवारी (दि. ९) भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी सिडको भवन येथे अभियंता श्री. मुळे यांच्याशी चर्चा केली.

या बैठकीस पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सदस्य सागरशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, कोपर गाव अध्यक्ष सुधीर ठाकूर, किशोर पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी सिडकोचे अभियंता श्री. मुळे यांनी पुढील १५ दिवसांच्या आत न्हावे व न्हावेखाडी गावासाठी शिवाजीनगर येथून हेटवणे धरणाची नवीन पाईपलाईन टाकून देणार आहोत तसेच जोपर्यंत लाईन टाकून होत नाही तोपर्यंत दिवसाला कमीत कमी चार टँकर पाणी न्हावे ग्रामपंचायतीला देऊ, असे आश्वस्त केले, तर गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील पाणीप्रश्नी स्वतंत्र बैठक घेऊन नियोजन करू, असे सांगितले.

## आज ‘सीकेटी’त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दर्जेदार शिक्षणासोबतच कला, क्रीडा, सामाजिक क्षेत्रातही उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व नामवंत अशा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्रोत स्व. चांगू काना ठाकूर यांच्या स्मरणार्थ शनिवारी (दि. ११) दुपारी ३.३० वाजता सीकेटी महाविद्यालयातील (स्वायत्त) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डीएव्ही (मुंबई) महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबई विद्यापीठाच्या कॉमर्स अ‍ॅण्ड मॅनेजमेंटचे अधिष्ठाता डॉ. अजय भामरे, मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार सुधीर पुराणिक, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तर प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, हेमलता म्हात्रे, एकनाथ गायकवाड, सीता पाटील, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या वतीने खेळाडूंसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देतानाच त्यांच्या कौशल्यात आणखी भर पडावी यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. त्यानुसार स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने १० ते १३ डिसेंबरदरम्यान जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन आणि पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १०) झाले. (पान २ वर..)

## राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा; भव्य पारितोषिके

**मुंबई :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २१वी राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. सर्वांत मोठ्या बक्षीस रकमेची म्हणून ही स्पर्धा ओळखली जाते.

या स्पर्धेत राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाला प्रथम पारितोषिक ७५ हजार रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय ५० हजार रु. व सन्मानचिन्ह, तृतीय २५ हजार रु. व सन्मानचिन्ह आणि बालकांसाठीच्या उत्कृष्ट दिवाळी अंकास १५ हजार रु. अशी भरघोस रकमेची पारितोषिके देण्यात येतील तसेच उत्कृष्ट कथा, कविता, व्यंगचित्र व विशेष विषयांवरील अंकालाही दोन ते पाच हजार रुपयांची रोख पारितोषिके दिली जातील. (पान २ वर..)






## ‘मांडूळ’ची विक्री करणारे गजाआड

**पनवेल :** विनापरवाना अवैधरीत्या मांडूळ जातीचा साप जवळ बाळगून त्याची विक्री करण्यासाठी आलेल्या त्रिकुटाला गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने पळस्पे फाटा येथील रस्त्यावर सापळा रचून अटक केली. यामध्ये आरोपी अरबाज मतीन शेख, शाशाअली सादीक पठाण, सागर नरसिंग शिंदे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील हॅण्ड बॅगमध्ये एक काळ्या रंगाचा मांडुळ जातीचा साप आढळून आला, तसेच ५०० रुपये किमतीचा इलेक्ट्रॉनिक वजन काटासुद्धा आढळून आला आहे.

## व्यापाऱ्याला लुटणाऱ्यांना अटक

**पनवेल :** कामोठ्यात व्यापारी संतोष जाधव यांच्याकडून १९ लाख रुपये लुटल्याची घटना घडली होती. या लुटारूंना मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे व कर्नाटक राज्य येथून कामोठे पोलीस ठाण्याचे पथक व गुन्हे शाखा २ पनवेलच्या पथकाने गजाआड केले आहे. अनिकेत जोमा म्हात्रे, कार्तिक सुशिल सिन्हा, किरण विजय पवार, भिमा रामराव पवार, मनोज गुरम्या राठोड अशी आरोपींची नावे आहे. आरोपी अनिकेत म्हात्रे हा व्यापारी जाधव यांच्या परिचयाचा असून त्याने त्याच्या साथिदारांसोबत हा कट रचल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## पनवेल मनपात होणार वाहतूक विभाग

**पनवेल :** महापालिका क्षेत्रातील वाहतुकीशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी पालिकेत यासाठी एक विशेष विभाग असणे गरजेचे असल्याने हा नवीन विभाग बनविण्यासाठी शुक्रवारी (दि. १०) झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांनी महत्त्वाच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, सहाय्यक आयुक्त, अधिकारी, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## पनवेलमध्ये फूड सेफ्टी ट्रेनिंग कार्यक्रम

**पनवेल :** इट राईट इंडिया अंतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने स्वच्छ फळे व भाजीपाला संदर्भात फूड सेफ्टी ट्रेनिंग सर्टिफिकेशन या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात करण्यात आले होते.

या वेळी रोझ बाजारमधील ७०पेक्षा अधिक भाजी विक्रेत्यांना लायसन्स, तसेच त्यानंतर ट्रेनिंग आणि ऑडिट प्रशिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यक्रमाला नगरसेविका दर्शना भोईर यांची प्रमुख उपस्थितीत लाभली, तर रायगडचे अन्न सुरक्षा अधिकारी सचिन आढाव, विक्रम निकम, उमेश कांबळे आदी हजर होते.



# संजय राऊतांवर गुन्हा दाखल करा

## खोपोली भाजप महिला मोर्चाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

शिवसेनेचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत यांनी भाजपच्या महिला नेत्यांबाबत त्याचप्रमाणे ज्येष्ठ नेत्यांबाबत आक्षेपजन्य वक्तव्य केल्याचा आरोप करीत, खोपोली भाजप महिला मोर्चाने खासदार राऊत यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निवेदन खोपोली पोलीस ठाण्यात शुक्रवारी (दि. १०) दिले.



संजय राऊत यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना भाजप नेत्यांविरुद्ध अश्लील तसेच स्त्रियांच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल, असे वक्तव्य केले असल्याचे या तक्रारीत म्हटले आहे. मुंबई भाजप महिला मोर्चा अध्यक्ष शीतल गंभीर देसाई यांनीही यासंदर्भात तक्रार नोंदविली आहे. याप्रकरणी पोलिसांनी संजय राऊतांवर गुन्हा नोंदवावा, अशीही मागणी त्यात केली आहे.

राऊत यांच्या विधानांची क्लीप समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाली आहे. त्यांचे वरील शब्द बिभत्स व अश्लील असल्याने स्त्री मनास लज्ञा उत्पन्न करणारे आहेत, तसेच राऊत यांनी लैंगिक शेरे मारून भाजपच्या सर्व महिला कार्यकर्त्यांचा विनयभंग केला आहे, असे तक्रारीत म्हटले आहे.

खासदार राऊत यांच्यावर गुन्हा दाखल करावा. या मागणीचे निवेदन खोपोली पोलीस ठाण्यात देण्यात आले. या वेळी शिष्टमंडळात महिला आघाडीच्या शहराध्यक्ष शोभा काटे, महिला सरचिटणीस अश्विनी अत्रे, कोषाध्यक्ष विमल गुप्ते, जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेटे, शहर चिटणीस सुनिता महर्षी आदींसह अनेक महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## कर्जतमध्ये लाचखोर लिपिक जेरबंद

**कर्जत :** कर्जत भूमिअभिलेख कार्यालयातील छाननी लिपिकाला १० हजारांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तालुका भूमिअभिलेख कार्यालयात जमिनीची मोजणी केल्यानंतरच हद्द कायम करणारा मोजणी नकाशा देण्यात टाळाटाळ केली जात होती. त्या कामासाठी या कार्यालयातील छाननी लिपिक दत्ता जाधव हे १० हजार रुपयांची मागणी करीत होते. दरम्यान, सततच्या त्रासाला कंटाळून आरवंद येथील कैलाश पेरणेकर या शेतकऱ्याने अलिबाग येथील लाचलुचपत विभागाच्या उपअधीक्षक सुषमा सोनवणे यांची भेट घेऊन तक्रार नोंदविली. त्यानंतर शुक्रवारी (दि. १०) कर्जत भूमिअभिलेख कार्यालयात अलिबाग लाचलुचपत विभागाने सापळा लावून जाधव यांना पेरणेकर यांच्याकडून १० हजार रुपये स्वीकारताना रंगेहात पकडले.







**पनवेल : तामिळनाडूमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले देशाच्या तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख (सीडीएस) बिपीन रावत व सहकाऱ्यांना भाजप युवा मोर्चातर्फे शुक्रवारी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आदरांजली अर्पण करण्यात आली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष व नगरसेवक विक्रांत पाटील, भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**

# गाढी नदीलगत संरक्षण भिंत उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांतून पनवेल तालुक्यात अनेक विकासकामे झपाट्याने होत आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नातून आणि जिल्हा नियोजन निधीमधून सुकापूर ग्रामपंचायत हद्दीतून वाहत असणाऱ्या गाढी नदीलगत संरक्षण भिंत उभारण्याचे काम सुरू झाले आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १०) करण्यात आले.

जनतेची सेवा करत पनवेल आणि उरण तालुक्याचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय जनता पक्ष काम करत राहणार आहे, असे प्रतिपादन तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी संरक्षण भिंतीच्या कामाच्या भूमिपूजनाच्या वेळी केले, तसेच हे काम चांगल्या दर्जाचे व्हावे अशा सूचनाही दिल्या.

या वेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पनवेल पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी उपसरपंच बुवा पाटील, भाजप डॉक्टर सेल पनवेल तालुका अध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, उपाध्यक्ष आत्माराम पाटील, पाली देवद ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, दिवेश भगत, प्रमोद भगत भाजप पाली देवद पंचायत समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सरचिटणीस उदय म्हस्कर, ज्येष्ठ नेते अनंता म्हस्कर, युवा नेते भरत म्हस्कर, भाजप युवा मोर्चा पाली देवद पंचायत समिती अध्यक्ष महेश केणी, मयूर कदम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## ‘लागू बंधू’तर्फे पनवेलमध्ये प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

८५ वर्षांपासून ग्राहकांच्या मनावर आपल्या सर्वांगसुंदर अलंकारांनी अधिराज्य गाजवणारे ज्वेलर्स लागू बंधू यांच्यातर्फे शनिवारी (दि. ११) व रविवारी (दि. १२) हिरे, मोती, पोवळे, नवरत्न व सोन्याच्या हॉलमार्क दागिन्यांच्या कलेक्शनचे प्रदर्शन पनवेल हॉटेल सुरूची येथे सकाळी ११ ते रात्री ८.३० या वेळेत आयोजित केले आहे.

ग्राहकांना विविध ऑफर्सद्वारे आकर्षक किमतीत दागिने खरेदी करण्याची संधी या प्रदर्शनामुळे मिळणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता ग्राहकांच्या हस्ते होणार आहे.

या प्रदर्शनास नागरिकांनी भेट द्यावी, यानिमित्ताने विविध दागिन्यांची माहिती घेता येईल व प्रदर्शनाचे आकर्षण असलेल्या दागिन्यांना जवळून पाहता येईल, असे लागू बंधू यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

पान १ वरून

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा

या वेळी रायगड बॅडमिंटन संस्थेचे सचिव डेव्हिड अल्वारीस, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सहाय्यक व्यवस्थापक श्यामनाथ पुंडे, व्यवस्थापन समिती सदस्य रवींद्र भगत, शिवा कराली, योगेश पाटील यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.

## राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा; भव्य पारितोषिके

खास रायगड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या उत्कृष्ट दिवाळी अंकाला प्रथम पारितोषिक २० हजार रु. व सन्मानचिन्ह, द्वितीय १० हजार व सन्मानचिन्ह, तृतीय पाच हजार रु. व उत्तेजनार्थ अंकास दोन हजार रु. अशी पारितोषिके देण्यात येतील.

या स्पर्धेत ज्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपल्या दिवाळी अंकाच्या दोन प्रती व प्रवेश शुल्क १०० रु. रोख, धनादेश अथवा डीडीद्वारे ३१ डिसेंबरपूर्वी मुंबई मराठी पत्रकार संघ, पत्रकार भवन, आझाद मैदान, महापालिका मार्ग, सीएसटी, मुंबई ४००००१ (फोन : ०२२-२२६२०४५१) आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. (फोन ०२२-६४५२९५२५) या पत्त्यावर पाठवावेत. धनादेश किंवा डीडी मुंबई मराठी पत्रकार संघ या नावाने काढावा, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे.








पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. ११ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

## कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

## कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना
- ३. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

## पनवेल ग्रामीण लसीकरण

- जाधववाडी
- चाळ रा.जि.प. शाळा
- सागवाडी
- बीड रा.जि.प. शाळा
- तक्का प. म. पा. शाळा
- हैदरवाडी मंदिर
- रोडपाली बौद्धवाडी
- रोडपाली कातकरीवाडी मंदिर
- चाफेवाडी
- नौपाडा रा.जि.प. शाळा


**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२१/प्र.क्र.१५/२०८/२१ दिनांक :- १०/१२/२०२१

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्र.४२, दिनांक २०/१२/२०२१**

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक २०/१२/२०२१ रोजी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे (आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फड़के नाट्यगृह, पनवेल) या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**सभा सूचना क्र. ४२ दिनांक २०/१२/२०२१ ची**
**विषय पत्रिका**

**१) मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.**
पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक १८/११/२०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
**२) प्रश्नोत्तरे**
**३) मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**

१. पनवेल महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्य श्री. शंकर सदू म्हात्रे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर नविन नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.

२. पनवेल महानगरपालिका स्थायी समिती सदस्य श्री. महादेव जोमा मधे यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त जागा भरणेबाबत.

३. पनवेल महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेच्या मालकीच्या मलनि:स्सारण वाहिन्या व भुमिगत गटारांची दोन वर्षाकरीता दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणेबाबत.

४. पनवेल महानगरपालिकेच्या मालकीचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील दैनंदिन भाडे दरात ७५% सवलत मिळणेबाबत.

५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ''अ'' खारघर येथील सेक्टर - १९ मधील भूखंड क्र. १४ येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणेबाबत.

६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ''ब'' कळंबोली येथील सेक्टर - ८ ई मधील भूखंड क्र. ०५,०६,०७ व ०८ येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणेबाबत.

७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ''क'' कामोठे येथील सेक्टर - १० मधील भूखंड क्र. १ बी येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणेबाबत.

८. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''अ'', सेक्टर - ३६, भूखंड क्र. १३, खारघर येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करणेबाबत.

९. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''ब'', सेक्टर - ०७, भूखंड क्र. G-१, नविन पनवेल (पू.) येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करणे.

१०. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''ड'', भूखंड क्र. १३, काळंद्रे येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम करणेबाबत.

११. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''अ'' खारघर येथील सेक्टर - २१ मधील भूखंड क्र. १५१ या जागेमध्ये महापौर यांचे निवासस्थान बांधणेच्या कामास सुधारित आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१२. पनवेल महानगरपालिकेकरीता कार, जीप, इनोव्हा, रिक्षा, बस, टेम्पो, ट्रक वाहने वाहनचालकासह ०३ वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर घेणेकामी नव्याने ई - निविदा मागविणेस तसेच सदरच्या खर्चास सर्व साधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील, खारघर नोड ''नो हॉंकिंग झोन'' (नो हॉर्न) म्हणून सूचित करणेबाबत.

१४. पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी हजेरी बुथ करीता कंटेनर केबिन खरेदी करुन बसविणेबाबत.

१५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील करणेत येणाऱ्या अंत्यविधिसाठी धोरण निश्चित करणेबाबत.

१६. पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये २ वर्षांकरिता पिण्याच्या पाण्याचे टँकर पुरविणेबाबत.

१७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व गावातील ( पनवेल शहर वगळता ) पाणीपुरवठा वितरण व देखभालीच्या सर्वसमावेशक कामासाठी (२+१ = ३) वर्षाकरिता मनुष्यबळ पुरविणेबाबत.

१८. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहरातील (पुर्वाश्रमीचे नगर परिषद क्षेत्र) पाणीपुरवठा योजनेच्या परिचालनासाठी (२+१ = ३) वर्षाकरिता मनुष्यबळ पुरविणे व निगा दुरुस्ती करणेबाबत.

१९. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नव्याने समाविष्ट २९ गावे व वाड्या अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्था करणे या कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेबाबत.

२०. पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये शहरातील महत्वाच्या मोठ्या रस्त्यांची तसेच द्रुतगती मार्गांची आधुनिक पध्दतीने साफसफाई करणेकरिता Mechanized Sweeping Machine खरेदी करणेबाबत.

२१. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १८ मधील स्वामी नित्यानंद रोड वरील कॉंक्रिट रोड (गार्डन हॉटेल ते पनवेल महानगरपालिका मुख्यालय) च्या दोन्ही बाजूस रस्ता रुंदीकरणासह पावसाळी गटार बांधणे, फूटपाथ बांधणे आणि इतर अनुषंगिक कामे करणेबाबत.

२२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील प्लॉट नं. २५ -, सेक्टर - १५ मध्ये उद्यान विकसित करणे अंतर्गत विरंगुळा केंद्र उभारणेबाबत.

२३. पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग अ, ब, व क ची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास मान्यता मिळणेबाबत.

(मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १०/१२/२०२१

**सही/-**
**(तिलकराज खापर्डे)**
नगर सचिव
पनवेल महानगरपालिका, पनवेल



# उरण पंचायत समितीवर दिव्यांगांचा मोर्चा

## ■ शासनाचा पाच टक्के निधी न दिल्यामुळे संघटनेतर्फे निदर्शने

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

शासनाच्या आदेशानुसार ग्रामपंचायत, पंचायत समितीतर्फे देण्यात येणारा पाच टक्के निधी मागील अनेक वर्ष न दिल्यामुळे उरण तालुक्यातील दिव्यांग संघटनेकडून अनेक वेळा निवेदन देऊनदेखील कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे उरणमधील दिव्यांग बांधवांनी पंचायत समिती कार्यालयासमोर निदर्शने केली.

दिव्यांगांसाठी शासनाकडून मिळणारा पाच टक्के निधी मिळण्यासंदर्भात गट विकास अधिकारी यांच्या दालनात ३ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. दिव्यांग निधी त्वरित वितरित केला जाईल, असे सांगण्यात आले, परंतु त्याची कोणतीही अंमलबजावणी झाली नाही. जागतिक अपंग दिनाच्या दिवशी ग्रामपंचायत, पंचायत समिती, उरण तहसीलदारांना तीव्र आंदोलन करणार याची नोटीस देण्यात आली होती, परंतु तरीही कोणतेही उत्तर न मिळाल्यामुळे शुक्रवारी (दि. १०) पंचायत समिती उरण येथे दिव्यांग बांधवांनी मोर्चा काढला.

गटविकास अधिकारी निलम गाडे यांनी लेखी स्वरूपात लिहून दिले की, चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीमार्फत दिव्यांग व्यक्तीकरिता पाच टक्के निधी मागील अनुशेष सहित रक्कम रुपये ८,५३,६२० रुपये खर्च करण्याचा आहे. हीच बाब शुक्रवारी कार्यालयासमोर चाणजेचे सरपंच व ग्रामसेवकांच्या सोबत चर्चा केली आहे. या चर्चेमध्ये दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कटाक्षाने पूर्ण करण्याबाबत सरपंच व ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत चाणजे यांना निवेदन देण्यात आले आहे. डिसेंबर महिन्याच्या ३१ डिसेंबर महिन्याच्या तारखेच्या आत निधी देण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व ग्रामपंचायतीचा पाच टक्क्यांमधील दिव्यांग निधीचा खर्च मार्च २०२२ अखेर १०० टक्के दिला जाईल.

मोर्चाला गटविकास अधिकारी निलम गाडे, उरण पंचायत समिती सभापती उपसभापती, माजी सभापती उरण पंचायत समिती सदस्य, बेरोजगार अपंग जीवन विकास समाज कल्याण संस्थेचे सर्व सदस्य, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष योगेश पाटील, उपाध्यक्ष महेंद्र म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, प्रा. राजेंद्र मढवी, चाणजे सरपंच, सर्व पंचायत समिती सदस्य, दिव्यांग बांधव ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

# अखेर पनवेल आगारातून पहिली एसटी बस सुटली

### प्रशिक्षणार्थी चालक पाठविल्याचा संपकऱ्यांचा आरोप

**पनवेल : प्रतिनिधी**

एसटी विलिनीकरणाच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी बंद पुकारला आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल आगारही बंद होते. अखेर शुक्रवारी (दि. १०) पनवेल आगारतून पहिली गाडी दादरला रवाना झाली. दरम्यान, या गाडीवर आगारातील चालक हजर नसल्याने प्रशिक्षण सुरू असलेला चालक देऊन प्रवाशांच्या जीवाशी एसटी प्रशासन खेळत असल्याचा आरोप संपकरी कर्मचाऱ्यांनी केला आहे.

राज्य शासनाने एसटी कर्मचाऱ्यांचे हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. राज्यात अनेक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊनही कर्मचारी कामावर हजर होत नसल्याने परिवहन मंत्री अनिल परब यांनी नवीन चालक-वाहक यांची भरती करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे चालकांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. पनवेल आगारात एक वाहक कामावर हजर झाला, पण चालक हजर नसल्याने प्रशिक्षण घेणाऱ्या चालकाला पनवेलला आणून पहिली गाडी दादरसाठी रवाना करण्यात आली.

पनवेल आगारातून पहिली गाडी सुटली, म्हणून पाठ थोपटून घेतली, मात्र चालकाला ४५ दिवस प्रशिक्षण आवश्यक असतानाही अर्धवट प्रशिक्षण घेतलेल्या चालकाला गाडीवर पाठवून देण्यात आले. त्यामुळे प्रशासन प्रवाशांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप संपकरी कर्मचाऱ्यांनी केला आहे.

दरम्यान, पनवेल आगारात पाठवलेला चालक हा जुनाच असून तो आजारपणाच्या मोठ्या रजेवर होता. त्याला नियमाप्रमाणे आठ दिवसांचे प्रशिक्षण देऊन पाठवण्यात आले, असे एसटी महामंडळाच्या मुंबई विभाग नियंत्रक मोनिका वानखेडे यांनी सांगितले.

### लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त

# कळंबोलीत नेत्रचिकित्सा शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजप कळंबोली शहर मंडळच्या वतीने कळंबोली येथील भारतीय जनता पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त दोन दिवस मोफत नेत्रचिकित्सा व अल्पदरात चष्मे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



रविवारी (दि. १२) व सोमवारी (दि. १३) असे दोन दिवस शिबिर घेण्यात येणार आहे. अनिल आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा कळंबोलीमधील नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप भटके-विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी केले आहे. कळंबोलीमधील नागरिकांना अशा सुख-सुविधांचा लाभ व्हावा, म्हणून कार्यालय चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या पुढाकारातून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

# उघड्या गटारांवर बसविली झाकणे

### नगरसेविका रूचिता लोंढे यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील उघड्या गटारांवर झाकणे बसविण्यात आली आहेत. याकामी नगरसेविका रूचिता लोंढे यांनी महापालिका आयुक्तांना पत्रव्यवहार केला होता.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील दुतर्फा बहुतांशी गटारे उघड्या अवस्थेत तसेच बंदिस्त गटारांवरील झाकणांची दुरवस्था झाली होती. तुटलेल्या झाकणांमुळे अपघात होण्याचा धोका लक्षात घेत नगरसेविका रूचिता लोंढे यांनी आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तत्परनेते पालिका आयुक्तांशी पत्रव्यवहार केला. त्यानुसार जय भारत नाका ते आदर्श हॉटेलपर्यंत गटारांवर झाकणे बसविण्यात आली आहेत.



# सेंट्रल मॉलला ५० हजारांचा दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत मास्क व लसीकरण नाही तर प्रवेश नाही अशा प्रकारची मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देशित करण्यात आलेले असताना नवी मुंबई महापालिकेच्या विशेष दक्षता पथकाला नेरूळच्या ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये मास्क परिधान न केलेला मॉल कर्मचारी आढळला. त्याची अधिक चौकशी केली असता त्याचे दोन्ही डोस पूर्ण झाले नाहीत असे निदर्शनास आले. नियमाचा भंग केल्याप्रकरणी ग्रँड सेंट्रल मॉल व्यवस्थापनाला पालिकेकडून ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला.

ओमायक्रॉनच्या नव्या संकटाने नवी मुंबई महापालिकेची विभाग कार्यालय स्तरावरील दक्षता पथके व मुख्यालय स्तरावरील विशेष दक्षता पथके अधिक सक्षमतेने कार्यरत करण्यात आलेली आहेत. साथरोग प्रतिबंध कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे संपूर्ण कोविड लसीकरण म्हणजेच कोविड लसीचे दोन्ही डोस पूर्ण होणे गरजेचे आहे, मात्र दोन्ही डोस घेतलेला नसल्याचे दक्षता पथकास आढळल्याने या नियमांचा भंग केल्याप्रकरणी ग्रँड सेंट्रल मॉल व्यवस्थापनाकडून दंड वसूल करण्यात आला.

नागरिकांनी गांभीर्यपूर्वक स्वत:च्या व इतरांच्या आरोग्य जपणुकीसाठी मास्कचा वापर नियमित करणे गरजेचे आहे. मास्कचा वापर न करता सामाजिक आरोग्याला धोका पोहचवणाऱ्या नागरिक व आस्थापनांविरोधात दंडात्मक कारवाई करणे समज मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. यापुढील काळात नागरिकांच्या हितासाठी अशा प्रकारच्या दंडात्मक कारवाया करणे गरजेचे आहे. तरी नागरिकांनी मास्कचा वापर न केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्याची कटू वेळ येऊ देऊ नये, असे नवी मुंबई पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले आहे.

# पनवेल रेल्वेस्थानक ते साईनगर बसफेऱ्यांत वाढ

### प्रवासी संघाच्या प्रयत्नाला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एनएमएमटीच्या प्रवासी बस सेवा पनवेल रेल्वे स्थानक ते साईनगरपर्यंत धावत आहेत. या विभागामधील राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांकडून सतत या विभागावर पनवेल रेल्वे स्थानकावरून रात्री १० पर्यंत बस चालवाव्यात, अशी मागणी होत होती. कोरोनाच्या सावटामुळे प्रशासनाकडून निर्णय घेतला जात नव्हता. प्रवासी संघाच्या वतीने कार्यकारिणीशी चर्चा करून बसफेऱ्यांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे.

चाकरमानी, शासकीय-निमशासकीय, महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यापारी बांधव इत्यादी प्रवासी बांधवांची गरज लक्षात घेऊन सद्यस्थितीत पनवेल रेल्वे स्थानक ते साईनगरपर्यंत शेवटची बस संध्याकाळी ७ वाजेपर्यंतच होती. त्यानंतर



साईनगर येथे जाण्यासाठी रिक्षा अथवा टॅक्सीशिवाय पर्याय उपलब्ध नव्हता. त्यामुळे आर्थिक, शारीरिक, मानसिक त्रास सहन करून चाकरमानी प्रवासी बांधवांना आपले घर गाठावेच लागत होते.

प्रवासी संघाच्या माध्यमाद्वारे एनएमएमटी परिवहन वाहतूक प्रशासनाला प्रवाशांची भूमिका व्यवस्थित मुद्दे पटवून दिल्यामुळे प्रशासनाने प्रवासी बस फेऱ्यांमध्ये सोमवार (दि. १३) पासून वाढ करण्याचे ठरवलेले आहे, असे आश्वासन प्रवासी संघाला वेळापत्रकासह देण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रवासी बांधव सुखावले आहेत. प्रवासी संघाच्या कार्यकारिणीचे व एनएमएमटी प्रशासनाचे हार्दिक आभार मानले आहेत. प्रवासी संघ, पनवेल या सामाजिक संस्थेचे कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य श्रीकांत बापट व सहकार्यवाह निलेश जोशी यांनी शिंदे व त्यांचे सहकारी यांचे आभार मानले आहेत.

प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे यांनी सर्व प्रवासी बांधवांना शासनाच्या नियमावलीप्रमाणे मास्क व सॅनिटायझर लावून प्रवास करावा, असे सांगितले आहे.

# युसुफ मेहेरअली सेंटरमधील क्ले आर्टवर्क प्रशिक्षणाची सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील यूसुफ मेहेरअली सेंटर, बांधनवाडी आणि टिस्सर आर्टिशियन ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने मधू-प्रमिला दंडवते संकुल बांधनवाडी येथे ३ ते ५ डिसेंबर या कालावधीत क्ले पॉटरी आर्ट प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. बांधणवाडी येथे गुरुवारी या कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

या प्रशिक्षणाचा लाभ ३४ महिला प्रशिक्षणार्थींनी घेतला असून टिस्सर आर्टिशियन ट्रस्टचे वैभव चव्हाण आणि आनंद वाघमारे यांनी सहभागी महिलांना क्ले च्या माध्यमातून शोभिवंत वस्तूंसह विविध प्रकारची फुले बनविण्याचे प्रशिक्षण दिले.

युसूफ मेहेरअली सेंटरचे प्रकल्प संचालक सुरेश रासम, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, रामदास गुरमे, कादंबरी पिसाट आणि संजय वेलादी या मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना भविष्यात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन या वेळी सुरेश रासम यांनी दिले आहे.



# कामोठ्यात दिव्यांग सप्ताहाची सांगता

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती, लायन्स क्लब ऑफ सेंटनरी स्टिल मार्केट नवी मुंबई आणि प्राचार्य यल्लाप्पा तायाप्पा वैदु प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये जागतिक दिव्यांग समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. पनवेल तालुक्यातील ५० दिव्यांग विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कामोठे येथील सुषमा पाटील हायस्कूल येथे दिव्यांग सप्ताहाची सांगता गुरुवारी (दि. ९) करण्यात आली.

या कार्यकमाचे औचित्य साधून गायन, वक्तृत्व, बादलीत चेंडू टाकणे, चित्रकला अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

लायन्स क्लब ऑफ सेंटनरी स्टिल मार्केट नवी मुंबईच्या अध्यक्ष योगिनी वैदू यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत नैपुण्य प्राप्त दिव्यांग मुलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाकरिता पनवेल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी महेश खामकर, विस्तार अधिकारी बबन म्हात्रे, गटसमन्वयक जोशी, केंद्रप्रमुख म्हात्रे, सुषमा पाटील कामोठे शाळेचे सचिव मंदार पनवेलकर, प्राचार्य यल्लाप्पा तायाप्पा वैदू प्रतिष्ठानच्या संचालिका इंदू वैदू, प्रतिभा मंडले, जयश्री शिर्के, लायन्स क्लब सेंटनरी स्टील मार्केट अध्यक्ष योगिनी यल्लाप्पा, वैदू स्नेहकुंज वृद्धाश्रम संचालक नितीन जोशी, डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन राजेंद्र महानुभाव आदी उपस्थित होते.

> **समाजातील शोषित वंचित घटकांच्या साठी त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहण्याची प्रेरणा मला वडिलांकडून मिळाली. त्यामुळे सामाजिक उत्तरदायित्व या भूमिकेतून अशा अभिनव उपक्रमांत सहभागी होण्याची संधी मिळते तेव्हा आम्ही आवर्जून त्यात योगदान देतो.**
> **-योगिनी वैदू, अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ सेंटनरी स्टिल मार्केट, नवी मुंबई**

प्राचार्य यल्लाप्पा वैदू प्रतिष्ठानकडून भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. योगिता कांबळे व सविता सहाणे, ज्योती म्हात्रे यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले. सुषमा पाटील हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हात्रे, अभिजित मटकर, चेतन गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. पनवेल डाएटचे समता विभाग प्रमुख सागर तुपे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा समन्वयक रवींद्र विशे, अॅड. निरंत पाटील आदी उपस्थित होते.



# कळंबोलीत दिव्यांग क्षमता महोत्सव ; विविध स्पर्धांना प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

दिव्यांग सप्ताह निमित्ताने कै. रघुनाथ आंबेरकर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था संचलित रत्नमाला कर्णबधिर व मतिमंद विद्यामंदिर, कळंबोली या संस्थेच्या वतीने दिव्यांग क्षमता महोत्सवाचे आयोजन बुधवारी (दि. ८) कळंबोली येथे करण्यात आले होते.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे दिव्यांगत्वाची ओळख समाजाला करून देणे, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे हा होता, असे संस्थेच्या अध्यक्ष माधुरी पंडित-आंबेरकर यांनी सांगितले. या वेळी दिव्यांग सन्मानार्थीमध्ये कविता पाटील (शैक्षणिक क्षेत्र), विनोद देवकर (क्रीडा क्षेत्र), देवेंद्र पाटील (शैक्षणिक क्षेत्र), शीतल चव्हाण व रुकसार राईन (कला क्षेत्र) यांना या वेळी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात फॅशन शोचेही आयोजन करण्यात आले होते.



या वेळी यामध्ये सर्वसामान्य व दिव्यांगांना एकत्रित करून सर्वसामान्यांप्रमाणे तेही कोठेही कमी नाहीत हाच उद्देश या शोमध्ये ठेवण्यात आला होता. या वेळी फॅशन शो मिस, मि. आणि बेबी नवी मुंबई २०२१ स्पर्धा झाल्या. यात बेबी नवी मुंबई २०२१ची विजेती नव्या आंबेरकर, पहिली उपविजेती ऋत्विज होडगे, दुसरी उपविजेती प्रणिती जाधव झाले, तर मिस नवी मुंबई २०२१ची विजेती शीतल चव्हाण (कर्णबधिर), पहिली उपविजेती रानी जैसवाल, दुसरी उपविजेती तनुजा म्हाडगुत झाले, तसेच मि. नवी मुंबई २०२१ चे विजेता भावेश फाळके, पहिला उपविजेता महेश काटारे (कर्णबधिर), दुसरा उपविजेता तन्मय म्हात्रे, विजेते झाले.

अनिकेत कुवेसकर व ज्ञानेश्वर बनगर यांनी हा शो कोरिओग्राफ केला होता, तसेच परीक्षक म्हणून जयेश पाटील, धर्मेश कडू व माधुरी गमरे-जगे यांनी काम पहिले. कार्यक्रमास दिशा महिला मंचच्या अध्यक्ष निलम आंधळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन संस्थेचे व्यवस्थापक अमोल आंबेरकर यांनी केले. दिलीप त्रिपाठी, बाळासाहेब हांडे, सचिव अमित कुलकर्णी यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीत्या झाला.

## संपादकीय

# पुन्हा खबरदारी हवीच

जगभरातील परिस्थिती पाहता केंद्र सरकारने मास्कच्या वापराबाबत जनतेमध्ये आलेल्या ढिलाईकडे लक्ष वेधले आहे. राज्य सरकारांनी नव्या कोरोना हॉटस्पॉट्सकडे बारकाईने लक्ष ठेवावे असेही केंद्राने म्हटले आहे. देशात शुक्रवारी ८५०३ नव्या कोविड रुग्णांची नोंद झाली. आरोग्य यंत्रणांशी सल्लामसलत करून कोरोनाच्या निरनिराळ्या विषाणू प्रकारांचा सामना करण्यासाठी बूस्टर डोसची आवश्यकता आहे का, याचा निर्णय घ्यावा अशी शिफारस संबंधित संसदीय समितीने केली आहे. बूस्टर डोससंदर्भात वैद्यकीय तज्ज्ञांमध्येच मतमतांतरे असल्यामुळे अद्याप यासंदर्भात निर्णय होऊ शकलेला नाही.

**येत्या काही आठवड्यांत युरोपात कोविड-१९मुळे होणारे मृत्यू तसेच रुग्णालयांत व आयसीयूमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत राहील असा इशारा युरोपियन सेंटर फॉर डिसीज प्रिव्हेंशन अॅण्ड कंट्रोलने नुकताच दिला आहे. एकंदर १९ युरोपीय देशांमध्ये मिळून एव्हाना जवळपास तीनशेच्या आसपास ओमायक्रॉन रुग्णांची नोंद झाली आहे. लसीकरणाचे प्रमाण अद्यापही पुरेसे नसल्याने युरोपात ओमायक्रॉनचा फैलाव वेगाने होण्याची भीती या संस्थेने व्यक्त केली आहे. दरम्यान दक्षिण कोरियातही महामारीच्या काळातील आजवरची सर्वाधिक गंभीर परिस्थिती दिसते आहे. सलग तिसऱ्या दिवशी त्या देशात नव्या कोरोना रुग्णांची संख्या सात हजाराच्या पुढे दिसून आली. तेथील सरकारने नोव्हेंबरपासून कोरोना निर्बंध कमालीचे सैल केले होते. आपल्याकडे कोरोनाचा सामना करण्यासाठी देशात १६ जानेवारीपासून लसीकरण सुरू झाले. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचारी, दुसऱ्या टप्प्यात अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, तिसऱ्या टप्प्यात ज्येष्ठ नागरिक, चौथ्या टप्प्यात सहव्याधी असलेले रुग्ण, पाचव्या टप्प्यात ४५ ते ५९ वयोगटातील नागरिक आणि सहाव्या टप्प्यात १८ ते ४४ या वयोगटातील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. केंद्र सरकार आणि निरनिराळी राज्य सरकारे देशात वेगाने लसीकरण व्हावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असले, तरी विशेषत: ग्रामीण भागांत विशिष्ट भागांमध्ये लसीकरणाला वेग येऊ शकलेला नाही. महाराष्ट्रातही मुंबई-पुण्यात लसीकरण प्रभावी रीतीने पार पडले असले तरी पुरेसा प्रतिसाद न मिळालेले काही जिल्हे महाराष्ट्रातही आहेतच. बूस्टर डोसची मागणी करत सतत केंद्र सरकारकडे बोट दाखवण्याऐवजी राज्यातील सत्ताधारी आघाडीने या जिल्ह्यांमध्ये आधी दोन डोस पूर्ण करून घेण्याकडेही लक्ष दिले पाहिजे. केंद्रानेही तशीच भूमिका जाहीर केली आहे. लसीकरणास पात्र नागरिकांपैकी ८६ टक्के जनतेने पहिला डोस घेतला आहे. आणि १०० टक्के लसीकरण लवकरात लवकर पार पडावे अशी केंद्राची इच्छा आहे, असे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी म्हटले आहे. दरम्यान, शुक्रवारी महाराष्ट्रातील ओमायक्रॉन बाधितांची संख्या १७ झाली. यात तीन जण मुंबईचे तर चार पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील आहेत. ओमायक्रॉनमुळे आजाराची सौम्य बाधा होत असली तरी त्यासंदर्भात अद्याप आणखी माहिती जमा होण्याची आवश्यकता आहे. त्याचा वेगाने होणारा फैलाव आणि जगभरातील भीतीचे वातावरण यामुळे श्रीमंत देशांकडून पुन्हा एकदा लशींची साठेबाजी होण्याची शक्यताही दाट आहे. तसे झाल्यास गरीब व विकसनशील देशांमध्ये लसींचा तुटवडा जाणवू शकतो. एकंदर परिस्थिती पाहता नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून मास्क, सोशल डिस्टन्सिंग, हात धुणे आदी कोविड प्रतिबंधक उपाययोजनांचे पूर्वी इतकेच काटेकोरपणे पालन करण्याची आवश्यकता आहे. आपल्याला पुन्हा एकदा कठोर निर्बंधांकडे जायचे नसल्यास आपण ही खबरदारी घ्यायलाच हवी.**

# सुधागड लेणी : ऐतिहासिक ठेवा जोपासण्याची गरज

**खबरबात**
धम्मशील सावंत

सुधागड तालुक्यात प्राचीन व बहुमूल्य लेण्यांचे समूह आढळतात. तालुक्यात ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेण्यांचा समूह आहे. देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. मागील वर्षी येथील लेण्यांमध्ये अमेरिकेतील भन्ते वेन सुका ध्यानधारणेसाठी आल्या होत्या. तर अनेक देशातील अभ्यासक येथे दौरेदेखील करत असतात, मात्र या प्राचीन लेण्यांकडे प्रशासन व पुरातत्त्व विभागाचे फारसे लक्ष नसल्याने त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या प्राचीन वास्तू नामशेष होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांचे जतन व संगोपन होण्याची अतिशय आवश्यकता आहे. दरम्यान, उपद्रवी लोकांकडून येथे रंगरंगोटी व विद्रुपीकरण करण्यात येत असल्याने लेणीप्रेमी व पर्यटकात नाराजी दिसून येते.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्धकालीन लेण्यांची पुरती दुरवस्था झाली आहे. येथील स्तुप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी चक्क ऑईलपेंटने नावे लिहिली आहेत. प्राचीन इतिहासाची साक्ष देणारा हा मौलिक ठेवा जोपासण्याची नितांत गरज आहे. अनेक पर्यटक व बौद्ध अभ्यासक इथे भेट देत असतात. पर्यटकांना योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्यास या ठिकाणी पर्यटन वाढीलादेखील खूप संधी आहे.

**ठाणाळे लेणी**

ठाणाळे लेणी समूहात चैत्यगृह, स्मारक, स्तुपसमूह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिख्खूंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. पाच पायऱ्या असलेल्या एका विहारात वाकाटककालीन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राह्मी लिपीतील शीलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राह्मी शीलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे, बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तुप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईलपेंटने आपली नावे कोरली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य लुप्त झाले आहे. ठाणाळे लेण्यांसारखा ऐतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी, अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.





ठाणाळे लेण्यांचा काळ हा इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ.स. पाचव्या शतकापर्यंत आहे. ही लेणी डोंगरामध्ये पश्चिमाभिमुख कोरलेली आहेत. लेण्यात सापडलेल्या विविध वस्तू व मौर्यकालीन चांदीची नाणी पाहाता ही लेणी २२०० वर्षापूर्वीची असल्याचे अनुमान काढण्यात येते. लेण्यांचा दगड हा अग्निजन्य (बेसाल्ट) आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतीम असलेल्या, तसेच मानवी जीवनाच्या आर्थिक जडणघडणीत या लेण्यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. वाघजाई घाटातून मावळात जाणारा प्राचीन मार्ग या लेण्यांजवळून जातो. कोकणातून घाटमार्गे देशावर जाता-येताना विश्रांतीचे स्थान म्हणून या लेण्यांचा उपयोग केला गेला. त्याचबरोबर बौद्ध भिख्खूंच्या भदन्त, आचार्य, परिव्राजक यांच्या निवाऱ्यासाठीसुद्धा या लेण्यांचा उपयोग इ.स. पाचव्या शतकापर्यंत करण्यात आला आहे.

या लेण्या अतिशय प्राचीन असून ऐतिहासिक दृष्ट्या खूप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे पुरातत्त्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकून येथील सौंदर्याला गालबोट न लावता, येथील परिसर साफ व संरक्षित कसा राहील, याची दक्षता घेतली पाहिजे, असे आवाहन शिवऋण प्रतिष्ठानने केले आहे. प्रतिष्ठाणतर्फे येथील परिसर साफ करून त्यासंदर्भातील लघुपटही प्रसिद्ध केला आहे.

**ठाणाळे लेण्यांपर्यंत कसे पोहचाल?**

पालीपासून ठाणाळे हे गाव १५ किमी अंतरावर आहे. ठाणाळे या गावी येण्यासाठी नाडसूरपर्यंत एसटीची सुविधा उपलब्ध आहे. नाडसूर ते ठाणाळे हे दोन किमी अंतर असून तेवढेच अंतर लेण्याकडे जाण्यासाठी चालावे लागते. ठाणाळे गावच्या पूर्वेकडे असलेल्या जंगलामध्ये ही लेणी आहेत. त्या भागाला चिवरदांड असे म्हणातात. क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनीही येथे आश्रय घेतला होता.

**नेणवली व चांभार लेणी**

खडसांबळे व नेणवली गावाजवळ सह्याद्री पर्वतात नेणवली लेण्या आहेत. लेण्यांचा मार्ग या दोन्ही गावापासून खरबाच्या वाटेने जातो. गावापासून लेणी सुमारे अडीच किमी अंतरावर आहेत व येथील जंगल राखीव वनक्षेत्र आहे. तेथे बिबट्याचे वास्तव्यदेखील आहे. या लेणी समूहात एकूण २१ लेण्या आहेत. काही लोक पूर्वापार या लेण्यांना पांडवलेणी म्हणूनच ओळखतात.

लेण्यांतील सर्वात मोठ्या सभागृहाच्या मागच्या बाजूस उंच व मोठा घुमट आहे. घुमट दगडांमध्ये व्यवस्थित कोरला आहे. घुमटचा व्यास १.५ मीटर उंची ३.५ मीटर आहे. घुमटावर मध्यभागी झाकणासारखा आकार असून चौरसाकृती छिद्र आहे. स्थानिक लोक या घुमटाला रांजण म्हणतात. सभागृहाच्या डाव्या बाजूस व मागील भिंतीत एकूण १७ खोल्या आहेत. प्रत्येक खोलीत दगडी ओटा आणि चौकोनी खिडकी आहे. काही खोल्या एकांतवासासाठी खोदल्या आहेत. या सभागृहांमध्ये ठाणाळे लेण्यांप्रमाणे नक्षीकाम किंवा लेण्याचा काळ ठरवण्यासाठी शिलालेख नाही. सभागृहाच्या पुढील बाजूस पाणी साठवण्याचे बंदिस्त टाके आहे. लेण्यांमध्ये काही ठिकाणी भिंतीस लागून शयन कोठे बांधले आहेत. व भिंतींमध्ये कोनाडे ठेवण्यात आले आहेत. या लेणी समूहात एकूण ११ लेणी असली, तरी मुख्य सभागृह व त्याच्या बाजूकडील सदनिका वगळता काही ठिकाणी लेणी कोसळली आहेत. काहींच्या भिंती तुटल्या व कोसळल्या आहेत. काहींचे अर्धे छत कोसळले आहे. तर एका ठिकाणी प्रांगणाचा भाग कोसळला आहे. हजारो वर्षांच्या ऊन-पावसाच्या माऱ्यामुळे वरच्या भागातून दगड कोसळत आहेत. याच लेण्यांच्या पश्चिम बाजूस अर्धा किलोमीटर अंतरावर चांभार लेणी आहेत, परंतु येथील डोंगराचे कडे तुटल्याने येथे जाता येत नाही. या लेणी समूहाचा उपयोग चौल बंदरातून नागोठणे मार्गे मावळात जाणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी केलेला आहे. ही प्राचीन लेणी १८८९ पर्यंत जगास अपरिचित होती, परंतु १८९० मध्ये रेव्हरंड ॲबंट यांनी लेण्यांचा प्रथम शोध लावला. तेव्हापासून या लेण्यांची काहीही दुरुस्ती झालेली नाही. प्रतिकूल निसर्ग परिस्थिती व मानवी देखभालीची उदासीनता यामुळे लेण्यांचा हा सांस्कृतिक ठेवा यापुढे आणखी किती काळ आपले अस्तित्व टिकवून ठेवेल याबाबत शंका आहे.

**नेणवली लेण्यांपर्यंत कसे पोहचाल?**

पालीपासून नेणवली व खडसांबळे हे गाव साधारण १५-१६ किमी अंतरावर आहे. खडसांबळे गावी येण्यासाठी पालीवरून एसटीची सुविधा उपलब्ध आहे. खडसांबळे ते लेणी हे अंतर चालत पार करावे लागते.

**गोमाशी लेणी**

गोमाशी येथे बौद्धकालीन लेणी समूह आहे. त्याला काही लोक भृगुऋषींची लेणी असे म्हणतात. गोमाशी गावाजवळ सरस्वती नदीकाठी खोंडा नावाचा डोंगर आहे. या डोंगरातील एका घळीत १.५ मीटर उंचीची भृगुऋषींची प्रतिमा कोरण्यात आली आहे, मात्र ही प्रतिमा गौतम बुद्धांची आहे असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. या लेण्यांकडे जायचे असेल तर पालीपासून गोमाशी अंतर १४ किमी आहे. गोमाशी गावापर्यंत एसटीची सोय आहे. या लेण्यांचीदेखील मोठी पडझड झाली आहे. लेण्यांपर्यंत जाणाऱ्या मार्गाचीदेखील दुरवस्था झाली आहे.

# पाल्हे येथे बहरतेय मानवनिर्मित कांदळवन

**अलिबाग : प्रतिनिधी**



तालुक्यातील पाल्हे येथे खाडीकिनारी २० हेक्टर क्षेत्रावर लावलेले मानवनिर्मित कांदळवन चांगले बहरत आहे. ओसाड जमिनीवर सागरी पर्यावरण बहरू लागले आहे. कांदळवनाच्या आधाराने स्थानिकांना चिंबोऱ्या, मासे पकडण्याचे साधन निर्माण झालेले आहे. झाडावर सुगरणीची घरटे दिसू लागले आहेत. यासह इतर पक्षांचीही किलबिलाट सुरू झाली आहे.

वाढते औद्योगिकीकरण, शेतीसाठी कांदळवनाची खूप मोठ्या प्रमाणात तोड झाल्याने सागरी पर्यावरणाला धोका वाढू लागला आहे. यावर उपाय म्हणून कांदळवनाची निर्मिती केली जात आहे. वनविभागाने पाल्हे येथे खाडीकिनारी २० हेक्टर क्षेत्रावर कांदळवनाची निर्मिती केली आहे.

काही वर्षांपूर्वी खारे पाणी न येणाऱ्या भागात गवत उवगलेले होते. आजूबाजूच्या गावातील गुरे या ठिकाणी चरायला सोडली जात होती. तर खाडी लगतचा भाग ओसाड होता. समुद्राला येणाऱ्या उधाणाचे पाणी अडवण्यासाठी कोणताही अडथळा नव्हता. त्यामुळे या परिसरात खारे पाणी शिरण्याची शक्यता अधिक होती. वनविभागाने २०१९ मध्ये तेथे कांदळवनाची ५० हजार रोपे लावली होती.

ती झाडे आता चांगली बहरली आहेत. अवेशिनीया मरीना, सिरॉप्स टॅगल, अवेशिनीया ऑफिसिनॅलिस, एजिसिप्स कॉनकुलॅटम, ब्रुगेरिया सिलेनडिका या जातींचा त्यात समावेश आहे. त्यामुळे या ओसाड जमिनीवर आता सागरी पर्यावरण बहरू लागले आहे.

कांदळवनाच्या आधाराने स्थानिकांना चिंबोऱ्या, मासे पकडण्याचे साधन निर्माण झालेले आहे. झाडावर सुगरणीची घरटे दिसू लागले आहेत. इतर पक्षांचीही किलबिलाट सुरू झाला आहे.

> **कांदळवन वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश येत आहे. ते आता प्रत्यक्षात दिसू लागले आहेत. या कांदळवनामुळे परिसरात खारेपाणी शिरणार नाही. त्याचबरोबर या ठिकाणी कांदळवनाची नैसर्गिकपणे वाढ होण्यास मदत होणार आहे.**
> **-आशिष ठाकरे,**
> **उपवनसंरक्षक, अलिबाग**

# वरसोली समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियान

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, प्रिझम सामाजिक विकास संस्थेचा उपक्रम

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र, प्रिझम सामाजिक विकास संस्था, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था व स्पर्धा विश्व अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. समुद्रकिनारा स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी या वेळी केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वरसोली समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्या वेळी रवींद्र नाईक उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. निसर्गाने आपल्याला भरभरून दिलेले आहे. त्याचा आपण वापर करताना निसर्गाचे नुकसान होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे, असे ते म्हणाले.

नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांनीही मनोगत व्यक्त केले. भारतीय सैन्याचे जवान मयूरेश गावंड, निसर्गप्रेमी तथा सामाजिक कार्यकर्त्या बेला दलाल, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा तथा स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, क्रीडा अधिकारी सचिन निकम, कुस्ती कोच संदीप वांजळे, सिमाली रवींद्र नाईक, बार्टीच्या समतादूत अनुजा पाटील यांच्यासह वरसोली ग्रामपंचायतीचे कर्मचारी, स्पर्धा विश्व अकॅडमी आणि प्रिझम संस्थेचे कार्यकर्ते आणि सुमारे १०० विद्यार्थी या स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.



# रायगडात आज राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि. ११) राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संदीप वि. स्वामी यांनी दिली.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, १३८ एनआय अॅक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले तसेच तडजोडपात्र नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयीकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास संपूर्ण कोर्ट फी परत मिळते, तसेच प्रलंबित व वादपूर्व प्रकरणातील निकालाविरुद्ध अपिल होत नाही. त्यामुळे पक्षकारांचा बराच वेळ व खर्च वाचतो. पक्षकारांना जलद व तत्काळ न्याय मिळतो. त्यामुळे शनिवारी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष विभा प्र. इंगळे यांनी केले आहे.

# मुरूडमधील महात्मा फुले पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अजित गुरव बिनविरोध

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अजित गुरव, तर उपाध्यक्षपदी अनघा चौलकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच सहाय्यक निबंधक अधिक्षक वाघमारे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. ही निवडणूक बिनविरोध झाली. या वेळी पतसंस्थेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून आदेश दांडेकर, संदेश दांडेकर, सायली गुंजाळ, महेंद्र पाटील, अमित कवळे, राहुल वर्तक, उमेश अपराध, संदेश भगत यांची निवड करण्यात आली.

महात्मा फुले पतसंस्था ही मुरूड शहरात तीन दशके कार्यरत असून १२ कोटी ठेवी असलेली ही संस्था आहे. आगामी काळात पतसंस्थेची नुतन वास्तू उभारून सर्वांच्या सहकार्याने शाखा विस्तार करणार असल्याचा मनोदय नवनियुक्त अध्यक्ष अजित गुरव यांनी या वेळी व्यक्त केला.

# पेणचे वैभव धनावडे साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित

**पेण : रामप्रहर वृत्त**

नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पेणचे वैभव दिलीप धनावडे यांना साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धनावडे यांच्या 'माझा एकलेपणा' या चारोळी संग्रहाला पुण्यातील साहित्य गौरव या संस्थेतर्फे हा पुरस्कार देण्यात आला. तो संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. योगेश जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

मराठी साहित्यविश्वात दर्जेदार साहित्य निर्मिती करून मराठी साहित्यासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. अभियंते म्हणून कार्यरत असलेले वैभव धनावडे चारोळी, कविता, कथा असे विविध साहित्यप्रकार लीलया हाताळतात. या पुरस्काराबद्दल धनावडे यांनी डॉ. मधुसूदन घाणेकर, डॉ. योगेश जोशी, ऋचा थत्ते आणि अक्षर आनंद न्यूज पोर्टल यांचे आभार मानले. पुरस्काराबद्दल श्री. धनावडे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



# अवकाळी पावसाचा अनेकांना फटका

## नुकसानग्रस्तांना शासनाने आर्थिक मदत देण्याची मागणी



**आलिबाग : रामप्रहर वृत्त**

नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाचा फटका अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील भातशेतीला बसला आहे. त्याचप्रमाणे आंबा, भाजीपाला व कडधान्य पिके, तसेच वीटभट्टी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे.

अलिबाग तालुक्यात नुकताच सलग तीन दिवस अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसाने विशेषतः खारेपाट भागात तयार झालेले भात पीक कुजून खराब झाले. वाल, चवळी, हरभरा, आदी कडधान्य पिकांचे, तसेच आंबा बागायतदार आणि वीटभट्टी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कुटुंबाचा गाडा कसा चालेल, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना सतावत आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदत केली नाही, तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना मदत व्हावी, यासाठी शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत. आणि शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी अलिबाग खारेपाटातील शेतकऱ्यांतून होत आहे.

# निजामपुरात घरफोडी; ७४ हजारांचा ऐवज लंपास

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील निजामपूर नवेनगर येथे गुरुवारी (दि. ९) घरफोडी करून अज्ञात चोरटे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज घेऊन फरार झाले आहेत.



निजामपूर नवेनगर येथील लकेश अशोक खांडेकर हे त्यांच्या बहिणीच्या घरी वास्तुशांती कार्यक्रम असल्याने गुरुवारी सकाळी घर बंद करून त्या ठिकाणी सहकुटुंब गेले होते. सकाळी ११.३० ते रात्री ८ या वेळेत अज्ञात चोरट्यांनी बंद घराच्या पाठीमागच्या दरवाजाची काडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. व लोखंडी कपाटामधून सोन्याचे दागिने आणि रोख ३२ हजार रुपये असा एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला.

या प्रकरणी लकेश खांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक श्री. बेग करीत आहेत.

# कल्पेश ठाकूर यांच्या हातून पुण्याचे काम होतच राहो –आमदार रविशेठ पाटील

### ■ पेणमध्ये देवदूत कार्य अहवालाचे प्रकाशन

**पेण : प्रतिनिधी**

अपघातग्रस्तांना गेली १७ वर्षे विनामूल्य सेवा व कोरोना काळात मोफत रुग्णवाहिका पुरविणारे, तसेच अन्नदान करणारे कल्पेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या देवदूत कार्य अहवालाचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

भविष्यातही कल्पेश ठाकूर यांच्याकडून जनतेची सेवा करण्याचे पुण्याचे काम होत राहो, असे आमदार रविशेठ पाटील म्हणाले.

आजकाल अनेकांकडे पैसा आहे. मात्र तो खर्च करण्याची दानत लागते, ती दानत कल्पेश ठाकूर यांच्याकडे आहे, असे आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले. आमदार महेंद्र दळवी यांचेही या वेळी समयोचित भाषण झाले.



(छाया : अनिस मनियार)

रायगड जिपचे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, पेण उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, महावितरण एसईए संघटनेचे सरचिटणीस संजय ठाकूर, तसेच दयानंद भगत, तुषार मानकवळे, यशवंत घासे आदींसह मान्यवर या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी कल्पेश ठाकूर यांनी केक कापून आपला वाढदिवस साजरा केला.

# 'स्वावलंबन क्वीन २०२१'च्या महाअंतिम फेरीस कर्जतमध्ये प्रारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वावलंबन फाउंडेशन मुंबई या संस्थेच्या 'स्वावलंबन क्वीन २०२१' या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा प्रारंभ शुक्रवारी (दि. १०) कर्जतमध्ये करण्यात आला. या महाअंतिम फेरीसाठी राज्यातील ८० महिलांची निवड झाली आहे.

स्वावलंबन संस्थेने राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, उस्मानाबाद आदी जिल्ह्यांतील सुमारे दोनशे महिलांची ऑनलाइन परीक्षा घेतली होती. त्यातून ८० स्पर्धकांची महाअंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. कर्जत तालुक्यातील पोसरी परिसरातील 'वसंत सृष्टी'च्या खुल्या सभागृहात शुक्रवारी महिला चित्रकार हर्षदा कडू हिच्या हस्ते या महाअंतिम फेरीचे उद्घाटन करण्यात आले.

हा उपक्रम म्हणजे महिला सक्षमीकरणाचा छोटासा प्रामाणिक प्रयत्न आहे, असे संस्थेच्या सचिव



विभा परब यांनी प्रास्ताविकात स्पष्ट केले. मनीषा सुर्वे यांनी या स्पर्धेचा हेतू विषद केला. ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुवर्णा काकुसते यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते मुकेश सुर्वे, संस्थेच्या खजिनदार वनिता चव्हाण, मानसी वेदक, उद्योजक संजय कडू, जान्हवी असलेकर, विद्या गोकर्णकर, सीमा देसाई–नायर, पूजा इंदुलकर, अंजली ब्रह्मे, अपर्णा खोत, सोनाली कोदे, सोनाली नाईक, अर्चना हेंदळेकर आदींसह महिला व स्पर्धक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायगडातील बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची सुवर्णसंधी

**अलिबाग : जिमाका**

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत १२ ते १७ डिसेंबर या कालावधीत राज्यस्तरीय, पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात रायगड जिल्ह्यातील सर्व बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची सुवर्णसंधी मिळणार आहे. हा मेळावा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता या विभागाच्या https://www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

ज्या उमेदवारांनी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या https://www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर यापूर्वीच नोंदणी केलेली असेल त्यांनी वेबपोर्टलवरील Employment-Job Seeker (Find a Job)-Jobseeker Login या मध्ये आपला नोंदणी क्रमांक म्हणजेच युजर आयडी व पासवर्ड वापरून नोंदणीतील आपली सर्व माहिती अद्ययावत करावी, तसेच ज्या उमेदवारांनी या विभागाच्या वेबपोर्टलवर नोंदणी केलेली नाही त्यांनी वेबपोर्टलवर Employment-Job Seeker (Find a Job)-Register या पर्यायावर क्लीक करून सर्व अद्ययावत माहिती भरून नवीन नोंदणी करावी, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त शा. गि. पवार यांनी कळविले आहे.

नोंदणी करताना भरलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर उमेदवारास प्राप्त झालेला नोंदणी क्रमांक व पासवर्ड वापरून वेबपोर्टलवरील Employment-Job Seeker (Find a Job)-Jobseeker Login मध्ये Registration Id (नोंदणी क्रमांक) व पासवर्ड भरून Login वर क्लिक करावे. त्यानंतर दिसणाऱ्या आपल्या नोंदणीच्या माहितीतील Pandit Dindayal Upadhyay Job Fairवर क्लीक करून दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपला जिल्हा निवडून Action-view details मध्ये रोजगार मेळाव्याची माहिती पाहावी व vacancy listing मध्ये रिक्त पदांची माहिती पाहून Apply पर्यायावर क्लिक करावे. त्यानंतरच ऑनलाईन रोजगार मेळाव्यातील उमेदवाराचा सहभाग पूर्ण होणार आहे.

उमेदवाराने रिक्त पदांकरिता Apply वर क्लिक केल्यानंतर संबंधित उद्योजकास वेबपोर्टलवर इच्छुक उमेदवारांची शैक्षणिक, व्यावसायिक इ. माहिती प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्याकडील रिक्त पदांकरिता ऑनलाइन पद्धतीने मुलाखत घेण्यासाठी उमेदवाराशी संपर्क साधणे शक्य होते, अशी माहिती शा. गि. पवार यांच्यामार्फत देण्यात आली असून उमेदवारास वेबपोर्टलवर नोंदणी करण्यासाठी काही समस्या येत असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या ०२१४१–२२२०२९ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **श्री. दिपक गोपाळ गुप्ता, पत्ता– योगी कृष्णा सीएचएस लि., फ्लॅट नं. १०६, बिल्डींग नं. डी–२५, योगी नगर रोड, बोरीवली–पश्चिम, मुंबई – ४०००९१** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे/जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**–: मिळकतीचे वर्णन :–**

**मौजे कल्हे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री. जॉन ॲलिक मिरांडा | ८५ | ०–४६–८०<br>पो.ख. ०–०५–८०<br>एकूण ०–५२–६० | ६.५६ |
| **पैकी ०–१६–०० (१६ गुंठे) या मिळकतीचे** | | | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **श्री. जॉन ॲलिक मिरांडा** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसापर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमूद केलेला व्यवहार पूर्ण केला जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :– ११/१२/२०२१**

**सही/–**
**ॲड. अतिश सुनील परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मो.नं. ९७०२८९८९८९**


# कर्जतमध्ये कोविड लसीकरण जनजागृती रॅली

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे मुंबई ही संस्था कर्जत तालुक्यात कोविड लसीकरण जनजागृती मोहीम राबवित आहे. या संस्थेने शुक्रवारी (दि. १०) कर्जत शहरात कोविड लसीकरण जनजागृती रॅली काढली होती.

नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, नगरसेवक बळवंत घुमरे, युनायटेड वे च्या रायगड समन्वयक रेखा जाधव यांच्यासह नगर परिषद कर्मचारी, पोलीस कर्मचारी, प्रहार अकॅडमी सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पोलीस मैदानावरून निघालेली रॅली कर्जत शहरात फिरून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौकामध्ये आली. त्या ठिकाणी सर्वांनी शपथ घेतली. मुख्याधिकारी डॉ. पाटील यांनी कोविड महामारी अजून गेली नाही, आपले लसीचे दोन्ही डोस झाले असले, तरी मास्क लावणे, वारंवार हात धुणे गरजेचे आहे, तसेच सामाजिक अंतर पाळायचे आहे, असे सांगितले.

या रॅलीत नियमित हात धुवा, खोकला किंवा शिंकता तेव्हा आपला चेहरा झाकून घ्या, बाहेर जाताना नेहमीच मास्क घाला, सामाजिक अंतर कायम ठेवा आणि मोठ्या संख्येने एकत्र येणे टाळा, आपल्याला अस्वस्थ वाटत असल्यास डॉक्टरांना भेटा, असे कोरोना मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करण्याबाबत जनजागृती करण्यात आली.




## खालापुरात फार्महाऊस मालकाकडून महिलेचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

मॉलिश करण्याचा बहाणा करत फार्महाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेचा फार्महाऊस मालक फकरमचंद (रा. कलोते, ता. खालापूर) याने विनयभंग केल्याची तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पीडित महिला ही सावेळे (ता. कर्जत) येथील राहणारी असून, कलोते येथील पॅरचंद फार्महाऊसमध्ये कामाला होती. फकरमचंद याने पीडितेला रूममध्ये बोलावून मॉलिश करण्यासाठी सांगितले. पीडिता मॉलिश करत असताना फकरमचंद याने तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.


**पनवेल महानगरपालिका**

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान** (DAY-NULM)

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत नागरी बेघरांना निवारा उपलब्ध करून देण्याबाबत शासन निर्णय तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. निवारा ही मानवाची मुलभूत गरज असल्याने अत्यंतिक गरीब – बेघर व्यक्तीला या योजनेद्वारे निवाऱ्याची व्यवस्था करणेत येते. नागरी बेघर निवाऱ्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, नागरी गरीब बेघरांना मुलभूत सोयी व सुविधा उदा. पाणी, स्वच्छता, सुरक्षितता, लाईट इ. उपलब्ध करून निवाऱ्याची सोय करणे.

शासन निर्णय व शासनाच्या अंमलबजावणी व मार्गदर्शक सूचनांनुसार पनवेल महानगरपालिकेला नागरी बेघरांकरीता निवारा उपलब्ध करावयाचा आहे, त्याकरीता खारघर क्षेत्रामध्ये १००० – १५०० स्क्वे.फु. बांधकाम असलेली जागा पनवेल महानगरपालिका भाड्याने घेणार आहे. सदर जागा ही रेल्वेस्थानक/बसस्थानक जवळ असल्यास तसेच जागेचे भाडे हे न्यूनतम असणाऱ्याला प्राधान्य देण्यात येईल. सबब इच्छुक जागाधारकांनी अटी व शर्तीच्या अधीन राहून मागणी केल्याप्रमाणे पनवेल महानगरपालिकेस आपले अर्ज जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत (२०/१२/२०२१ पर्यंत) सादर करावेत. सदर जाहीर सूचना पनवेल महानगरपालिकेच्या http://www.panvelcorporation या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**अर्ज सादर करण्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१. अर्जदारांनी आपले अर्ज विहित तारखेपर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या डे एन यु एल एम विभाग, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सादर करावेत.
२. दिलेल्या तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
३. अर्जासोबत अर्जदारांनी स्वतःच्या मालकीचे जागेच्या कागदपत्रांच्या प्रती व अपेक्षित भाडे सोबत जोडणे आवश्यक आहे.
४. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
५. अर्जदारांनी आपले अर्ज बंद लिफाफ्यामध्ये पूर्ण पत्त्यासह सादर करणे बंधनकारक आहे.

**प्राप्त अर्जांपैकी एक अथवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.**

**पमपा/DAYNULM/SUH2321/प्र.क्र.०८/७३/२०२१**
**दिनांक : १०/१२/२०२१**

**सही/–**
**(गणेश शेटे)**
**उपायुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**



**पेण नगर परिषद, पेण, जि. रायगड**

**जाहीर सूचना**

**घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य (उपयोगकर्ता शुल्क)**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३१२ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४–ब १ जुलै, २०१९/आषाढ १० शके १९४१ अनुसरून भाग–अ (उपयोगकर्ता शुल्क) महाराष्ट्र शासनाचे राजपत्र तसेच घनकचरा हाताळणी अधिनियम २०१६, दि. ०८ एप्रिल, २०१६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून पेण नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे रक्कम रुपये दरमहा उपयोगकर्ता शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | वर्गवारी | नगरपरिषद (अ व ब वर्ग) | नगरपरिषद (क वर्ग) /नगरपंचायत |
|---|---|---|---|
| | **घनकचरा निर्मिती १०० किलोपेक्षा कमी** | | |
| १. | प्रती घर | ३० | १५ |
| | **व्यावसायिक आस्थापना** | | |
| २. | दुकाने, दवाखाने इत्यादी | ४५ | ३० |
| ३. | शोरूम (उपकरणे/फर्निचर/ऑटोमोबाईल/इलेक्ट्रीकल इ.) | ८० | ६० |
| ४. | गोदाम | ८० | ६० |
| ५. | उपहारगृहे व हॉटेल | ८० | ६० |
| ६. | राहण्याची व जेवण्याची व्यवस्था असणारी हॉटेल | १०० | ८० |
| | **रुग्णालय** | | |
| ७. | पन्नास (५०) खाटापेक्षा कमी | ८० | ६० |
| ८. | पन्नास (५०) खाटापेक्षा जास्त | १२० | ९० |
| | **संस्था** | | |
| ९. | शैक्षणिक संस्था, वसतिगृहे | ६० | ४५ |
| १०. | धार्मिक संस्था | ६० | ४५ |
| ११. | शासकीय/निमशासकीय कार्यालय | ६० | ४५ |
| १२. | विवाह कार्यालये/मनोरंजन सभागृहे/एक पडदा चित्रपटगृह | ५०० | ३०० |
| १३. | खरेदी केंद्र/बहुपडदा चित्रपटगृह | १००० | ५०० |
| १४. | फेरीवाले | ३० | १५ |
| १५. | पर्यटन स्थळी घोड्याची लीद | ३०० | २०० |
| १६. | हंगामी दुकाने आनंद मेळा/सत्संग/खाद्य महोत्सव/फटाक्याचे दुकान | स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत मासिक शुल्क न आकारता एक वेळेस शुल्क आकारण्यात येईल. | |

तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी व नगरपरिषदेस सहकार्य करावे.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

## १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धा

# टीम इंडियाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे २३ डिसेंबरपासून होणाऱ्या १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आशिया चषक स्पर्धेसाठी २० सदस्यीय संघ निवडला आहे. या संघाचा कर्णधार यश धूळ आहे.

अखिल भारतीय ज्युनियर निवड समितीने आशियाई क्रिकेट परिषद स्पर्धेपूर्वी ११ ते ९ डिसेंबरदरम्यान बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमी येथे शिबिरासाठी २५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे.



जुन्नर तालुक्यातील कौशल तांबेचीही या संघात निवड झाली आहे. कौशलला यापूर्वी बांगलादेशविरुद्ध झालेल्या तिरंगी मालिकेत १९ वर्षांखालील भारत ब संघात संधी मिळाली होती. अष्टपैलू खेळाडू म्हणून कौशलची ओळख आहे.

कौशल मागील १० वर्षांपासून केंड्रस क्रिकेट अकादमीत प्रशिक्षण घेत आहे. पुण्यातील एसपी कॉलेजमध्ये प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या कौशलने विविध क्लबमधून क्रिकेट खेळले. २०१६मध्ये त्याला एमसीएचा उदयोन्मुख खेळाडू म्हणून गौरवण्यात आले होते.

वसू वत्स याचाही २० जणांच्या संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र त्याच्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह आहे. तो वेळेत फिट झाला तरच ही स्पर्धा खेळू शकेल. शिवाय, स्टँडबाय खेळाडू म्हणून बीसीसीआयने आयुष सिंग ठाकूर, उदय सहारन, शाश्वत डंगवाल, दानुष गोडा आणि पीएम सिंग राठौर यांची निवड केली आहे. हे खेळाडू राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या शिबिराचा भाग असतील.

### असा आहे संघ

*हरनूर सिंग पन्नू, अंगक्रिश रघुवंशी, अंश गोसाई, एसके रशीद, यश धूळ (कर्णधार), अन्नेश्वर गौतम, सिद्धार्थ यादव, कौशल तांबे, निशांत सिंधू, दिनेश बाना (यष्टीरक्षक), आराध्य यादव (यष्टीरक्षक), राजनगड बावा, राजवर्धन हंगरगेकर, गर्व सांगवन, रवी कुमार, रिषिथ रेड्डी, मानव पारख, अमृत राज उपाध्याय, विकी ओस्वाल, वासू वत्स.*

## राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत ठाण्याच्या रुद्रांक्षचा डंका

### तिन्ही प्रकारांत रौप्यपदकाला गवसणी



**ठाणे : प्रतिनिधी**

मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ६४व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारामध्ये वरिष्ठ, कनिष्ठ आणि युवा या तिन्ही गटात ठाण्यातील रुद्रांक्ष पाटील याने रौप्यपदके पटकावली आहेत. रुद्रांक्षच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

भोपाळ येथे राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा सुरू आहे. यात शुक्रवारी (दि. १०) झालेल्या १० मीटर एअर रायफल प्रकारामध्ये रुद्रांक्षने उत्कृष्ट कामगिरी करीत वरिष्ठ, कनिष्ठ आणि युवा या तिन्ही गटातील प्रकारामध्ये रौप्यपदकाची कमाई केली.

यापूर्वी रुद्रांक्षने पेरू येथील कनिष्ठ गटातील जागतिक स्पर्धा जिंकली होती. कोरोनाच्या कालावधीतही सरावामध्ये त्याने खंड पडू दिला नाही. राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेच्या कालावधीत त्याची परीक्षा सुरू होती. या परिस्थितीतही त्याने पदके जिंकली, असे रुद्रांक्षचे वडील बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

## आरोग्य प्रहर

### हिवाळ्यात अशी घ्या आपल्या त्वचेची काळजी

कोणताच चेहरा कोणत्याही ऋतूचा मार सहन करू शकत नाही. यासाठी चेहऱ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. हिवाळ्यातील थंडीने त्वचा एकदम शुष्क होते. त्वचेची नमी कायम राखण्यासाठी पुरेसे पाणी प्या. मॉइश्चराइजर लावा. फेशिअल करा. ग्लिसरीन व कोल्ड क्रिम चेहऱ्याला लावा. वेळ मिळेल तेव्हा केस शाम्पूने स्वच्छ धुवा. थंडीत त्वचेची जितकी जास्त काळजी घ्याल तितके ती सुंदर दिसेल.

हिवाळ्यात त्वचेची अधिक काळजी घेण्याची गरज असते. या हंगामात त्वचेचा कोरडेपणा वाढतो. हे हवामान त्वचेतील नैसर्गिक



ओलावा शोषून घेते. त्वचेला तजेलदार ठेवण्यासाठी आपण मॉइश्चरायझरचा वापर केला पाहिजे. आपण काही घरगुती उपाय करूनही त्वचेला मऊ आणि हायड्रेटेड ठेऊ शकतो. हे उपाय नेमके कोणते हे जाणून घेऊयात.

**तूप आणि खोबरेल तेल –** तूप त्वचेला हायड्रेट करण्याचे काम करते. तूप आणि खोबरेल तेल या दोन्हीमध्ये नैसर्गिक घटक असतात. जी त्वचेसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. तुपात वृद्धत्वविरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे त्वचेच्या वृद्धत्वाची लक्षणे कमी होतात. हिवाळ्याच्या हंगामात तूप आणि खोबरेल तेल मिक्स करून त्वचेला लावल्याने कोरड्या त्वचेची समस्या दूर होण्यास मदत होते.

**कोरफड –** कोरफड आपल्या त्वचेसाठी फायदेशीर आहे. विशेष म्हणजे कोरफड कोरड्या त्वचेची समस्या दूर करण्यास मदत करते. आंघोळीनंतर तुम्ही मॉइश्चरायझर म्हणून कोरफड वापरू शकता. कोरफडमध्ये चिमूठभर हळद मिक्स करा आणि आपल्या त्वचेला लावा. यामुळे चेहऱ्यावरील पिंपल्स दूर होण्यास मदत होते.

**दूध आणि मध –** हिवाळ्याच्या हंगामात कोरड्या त्वचेची समस्या दूर करण्यासाठी मध आणि दूध देखील खूप फायदेशीर आहेत. यासाठी दोन चमचे दूध मधामध्ये मिक्स करा आणि चेहऱ्याला लावा. यामुळे कोरड्या त्वचेची समस्या देखील दूर होण्यास मदत मिळते.

**क्लींजिंग –** चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी आणि ताजेतवाने वाटण्यासाठी दिवसातून दोनदा चेहरा धुणे आवश्यक आहे, मात्र त्यामुळे हिवाळ्यात त्वचेला कोरडेपणा येऊ शकतो. त्यामुळे अधिक रासायनिक उत्पादने वापरणे टाळावे. तुम्ही सौम्य किंवा नैसर्गिक क्लीन्सर वापरू शकता.

**(टीप : कोणत्याही उपचारांपूर्वी डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा.)**

## जे. डी. इलेव्हन संघाने क्रिकेट लीग जिंकली





(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका आदिवासी टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आदिवासी क्रिकेटपटूंसाठी प्रीमियर लीग २०२१चे आयोजन करण्यात आले होते. व्यावसायिक पद्धतीने खेळविल्या गेलेल्या या पाच दिवसीय लीगचे विजेतेपद जे. डी. इलेव्हन संघाने पटकाविले.

कर्जत तालुक्यातील बेकरे येथील मैदानावर स्पर्धा रंगली. यात आदिवासी समाजातील ५००हून अधिक खेळाडूंनी नाव नोंदणी केली होती. २० व्यावसायिक संघांमध्ये ४०० खेळाडूंना सहभागी करून घेण्यात आले. स्पर्धेच्या उद्घाटनास जि. प.चे उपाध्यक्ष सुधाकर घारे, आदिवासी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडा, आदिवासी टेनिस क्रिकेट असोसिएशन कर्जतचे अध्यक्ष नरेश शेंडे, कैलास खडके, सोमनाथ वाघमारे, शरद ठोंबरे धनजय पवार, प्रकाश लोभी, हेमंत खंडवी आदी उपस्थित होते.

अंतिम सामन्यात जे. डी. इलेव्हन संघाने स्वप्नील इलेव्हन संघावर मात करीत विजेतेपद पटकावले. तिसरा क्रमांक सह्याद्री आणि चौथा जीसीएसके या संघांनी मिळविला. उत्कृष्ट फलंदाज प्रकाश पारधी, उत्कृष्ट गोलंदाज दीपक निरगुडा आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून वसंत पवार व स्वप्नील यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि उल्लेखनीय खेळाडूंना पारितोषिकाने गौरविण्यात आले.





**रसायनी : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी पनवेल तालुक्यातील जाताडे येथील मंदिर जीर्णोद्धार, मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्यास भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पं. स. विभागीय अध्यक्ष सुनील माळी, जाताड्याचे उपसरपंच सतिश पाटील, माजी सरपंच श्वेता संतोष म्हात्रे, सावळ्याचे माजी सरपंच शिवाजी माळी, वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य महादेव कांबळे तसेच संदीप पाटील, राजेश माळी, रोहिदास तोंडे, प्रमोद भोईर, मच्छिंद्र पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.**



**पनवेल : किंजल स्पोर्ट्सच्या वतीने नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानात आदर्श चषक २०२१ या महिलांसाठीच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या स्पर्धेला भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी माजी नगराध्यक्ष संदीप पाटील उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.**



## उत्तम माने यांची तिहेरी 'सुवर्ण' कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील उत्तम माने यांनी राज्यस्तरीय मास्टर्स अॅथलेटिक्स स्पर्धेत तीन सुवर्णपदके पटकाविली. पुणे इंदापूर येथे ही राज्यस्तरीय स्पर्धा झाली.



या स्पर्धेत माने यांनी लांब उडी, तिहेरी उडी, तसेच हातोडाफेक या अथलेटिक्सच्या तिन्ही स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. मुख्य म्हणजे माने हे ६७ वर्षांचे असून त्यांनी ६५ वयोगटावरील स्पर्धकांमध्ये भाग घेऊन पदकांची हॅट्ट्रिक केली.

माने हे क्रीडा शिक्षक म्हणून माहीम (मुंबई) येथील लोकमान्य विद्यामंदिरातून निवृत्त झाले असून त्यांनी आपली खेळाची आवड जपली आहे. आपल्या कामगिरीतून त्यांनी शारीरिक तंदुरुस्तीचे उदाहरण दाखवून दिले आहे. ते सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य आहेत.






**पनवेल : हैदराबाद येथे झालेल्या एशियन थाय बॉक्सिंग स्पर्धेत युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन (यूएसकेए) इंडियाच्या प्रद्युम्न म्हात्रे याने सुवर्णपदक, आरव शेट्टीने रौप्यपदक, तर नवीन पडवळ, वीर मुंबईकर, रूद्र चौधरी यांनी कांस्यपदक पटकाविले. त्यांना यूएसकेएचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर, रायगड थाई बॉक्सिंगचे अध्यक्ष सागर कोळी, संघाचे मुख्य प्रशिक्षक प्रशांत गांगर्डे, रोहित भोसले, प्राची पवार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे जि. प. सदस्य अमित जाधव, भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष महेश पाटील, पाली देवदचे सरपंच तथा सोशल मीडिया तालुका अध्यक्ष राजेश पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com